बिमस्टेकच्या दहशतवादविरोधी आणि आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारीविरोधी संयुक्त कार्यगटाची (जेडब्ल्यूजी-सीटीटीसी) 11वी बैठक

भारत सरकार यजमान असलेल्या बिमस्टेकच्या दहशतवादविरोधी आणि आंतरराष्ट्रीय संघटित गुन्हेगारीविरोधी संयुक्त कार्यगटाची (जेडब्ल्यूजी-सीटीटीसी) 11वी बैठक 28-29 सप्टेंबर 2026 रोजी नवी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली होती. बांगलादेश, भूतान, भारत, म्यानमार, नेपाळ, श्रीलंका आणि थायलंड या सर्व बिमस्टेक सदस्य राष्ट्रांच्या शिष्टमंडळाने या बैठकीत सहभाग घेतला.

2. डॉ. सुहेल अजाज खान (अतिरिक्त सचिव (दहशतवाद प्रतिरोध), परराष्ट्र व्यवहार मंत्रालय) यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली.

3. या बैठकीत बिमस्टेक क्षेत्रातील पारंपारिक आणि संभाव्य बिगर-परंपरागत सुरक्षा धोक्यांविषयक चर्चा करण्यात आली. या बैठकीत सहभागी सदस्यांनी दहशतवाद आणि आंतरराष्ट्रीय संघटित गुन्ह्यांचा मुकाबला करण्यासाठी या प्रदेशातील सहकार्य आणि समन्वय अधिक बळकट करण्याच्या दृष्टीने विविध मुद्द्यांवर चर्चा केली आणि शिफारसी सूचविल्या. या बैठकीत बिमस्टेक जेडब्ल्यूजी-सीटीटीसी अंतर्गत विविध उपगटांच्या बैठकींच्या अहवालांवरही चर्चा करण्यात आली. या उपगटांमध्ये i) मानव तस्करीविषयक उपगट; ii) अमली पदार्थ, मनोप्रभावी पदार्थ आणि पूर्वगामी रसायनांच्या अवैध तस्करीला प्रतिबंध करण्याविषयीचा उपगट; iii) मनी लाँडरिंगविरोधी आणि दहशतवादाच्या वित्तपुरवठ्याविरोधात लढा देण्याविषयीचा उपगट; iv) कायदेशीर आणि कायदा अंमलबजावणीविषयक मुद्द्यांवरील उपगट; आणि v) कट्टरतावाद व दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी सहकार्याविषयीचा उपगट यांचा समावेश आहे.

नवी दिल्ली

29 सप्टेंबर 2026